*महाशिवरात्री उत्सव निमंत्रण पत्रक*

*नमस्कार ,* 🙏🏻
*श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार पुणे ®*
*वर्षे ४१ महाशिवरात्री उत्सव २०२२.*

*यंदाच्या वर्षीचा महाशिवरात्री उत्सव सोहोळा "माघ कृष्ण १४ शके १९४३", मंगळवार दिनांक १ मार्च २०२२ आणि पारणं व महाप्रसाद बुधवार. दि. २ मार्च २०२२ या दिवशी श्री देव व्याघ्रेश्वर मंदीर", आसूद, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे आपल्या परिवारातर्फे साजरा होणार आहे.*

*उत्सव देणगी शुल्क म्हणून ₹ ५००/ प्रति व्यक्ती आकारली आहे*

*सात वर्षांखालील मुलांसाठी उत्सव शुल्क नाही.*

*भक्तांचे वाहन घेऊन येणाऱ्या बसेस, कार इ.  वाहनांचे चालकांसाठी उत्सव देणगी पासेस काउंटरवरून चालकाचे नाव, पत्ता व गाडी नंबर देऊन संबंधीत गाडी मालकानेच रू. ५०० / प्रती चालक भरून घ्यावेत.*

*परस्पर ड्रायव्हरला पाठविल्यास पास दिला जाणार नाही*

*आणखी आणि तितकीच महत्वाचे : प्रत्येक गाडी मालकाने आपापल्या गाडीच्या चालकाला एक विनंती वजा सूचना नक्की द्यावी भक्त निवासाचे आवार सोडून इतरत्र फिरायला जाऊ नये. आवश्यकता भासेल तेंव्हा उपस्थित वयस्कर भक्तांना भक्तनिवास ते मंदिर व मंदिर ते भक्तनिवास नेण्या - आणण्याची मदत करावी*

*हे संपूर्ण महाशिवरात्री उत्सवासाठी एकत्रित व प्रतिव्यक्ति शुल्क आहे*

*उपस्थित भक्तांची निवास तसेच तारीख २८फेब्रुवारीचे रात्रीचे भोजन १ मार्च महाशिवरात्रीचा दोन्ही वेळचा फराळ ,तारीख २ मार्चचा चहा-कॉफी महाप्रसादाचे भोजन व्यवस्था सदर देणगी शुल्कात समावेश केलेली आहे*

*सध्याच्या महामारीच्या परिस्थितीमुळे व वर्तमान प्रशासकीय मार्गदर्शक तत्वांनुसार महाशिवरात्री उत्सव फक्त शंभर (१००) भक्तांच्या उपस्थितीत साजरा करण्याचा निर्णय केला आहे. शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्यासाठी सामाजिक जवाबदारी म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.*

*#ज्यांचे दोन्ही डोस झाले असतील त्यांनाच प्राधान्य राहणार आहे*

*# ज्यांनी अजूनही व्हाक्सिन डोस घेतले नसतील स्वतःच पुढाकार घेऊन ते घेणे गरजेचे आहे ....*

*#उत्सवादरम्यान तोंडावर मास्क असणे बंधनकारक आहे.*

*#उत्सवात आपण सोशल डिस्टन्सिंग पण पाळणार आहोत.*

*#देशाच्या व सामाजिक हिताकरिता कोरोना प्रतिबंधक लस जरूर घ्या आपले आणि आपल्या परिवाराचे संरक्षण करा.*

*तसेच उपस्थित राहू इच्छिणाऱ्या सर्वांनीच पत्रकात दिलेल्या न्यासाच्या खात्यात दि. २५ फेब्रुवारी२०२२ पर्यंत आगाऊ उत्सव देणगी मूल्य भरणे अवश्यक आहे.*

*उपस्थित राहणाऱ्यां सभासदांनी कृपया आधी (२५फेब्रुवारी पर्यंत) कळवावे ही नम्र विनंती त्यानुसार आम्हाला व्यवस्था ठेवायला सोपे होईल.*

*आपण रक्कम भरल्याची व आपल्या उपस्थितीची माहिती रक्कम भरल्यावर त्वरीत त्याची पावती किंवा स्क्रिनशॉट व्हाट्सएप / एस एम एस किंवा दूरध्वनीवर परिवार न्यासाचे सहकार्यवाह श्री श्रीनिवास रानडे यांना ९८२२९६२४५४ या क्रमांकावर कळवावी ही विनंती.*

*महत्वाचे ज्यांनी आगाऊ उत्सव देणगी शुल्क भरले असेल त्यांचीच व्यवस्था भक्तनिवासात करता येईल*

*जे न कळवता येतील त्यांची गैरसोय व्हायला नको म्हणून सक्तीची नियमावली*

*उपस्थिती संख्येवर नियंत्रण ठेवण्यास सोयीचं होईल हे करणे गरजेचं आहे....*

*कोविड च्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता महाशिवरात्री उत्सव अत्यंत साधेपणाने साजरा करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सर्व मंदिर विश्वस्त/कार्यकारीणी यांनी मंदिरात देवदर्शनासाठी गर्दी होणार नाही व सोशल डिस्टन्सिंगचे पालन होईल याकडे विशेष लक्ष ठेवले आहे.*

*कोरोनाचा प्रादुर्भाव अद्यापही कमी झालेला नसून सध्या राज्यात तसेच मोठ्या शहरांमध्ये नियमांच्या शिथिलते मुळे रूग्णांच्या संख्येत पुन्हा वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे, उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करता यावर्षी दिनांक १ मार्च रोजीचा महाशिवरात्रीचा उत्सव अत्यंत साधेपणाने साजरा करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने गृह विभागाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत-*

*राज्यात एक फेब्रुवारीपासून कोविड संसर्ग रोखण्यासंदर्भातील 'ही' नवीन नियमावली लागू केलेली आहे .!*

*मार्गदर्शक सूचना-  या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष उत्सव सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिद्ध झाल्यास त्यांचे देखील पालन करणे आपल्या सर्वांवर बंधनकारक आहे.*

*प्रत्यक्ष मंदिरात येऊन दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी स्वत:हून मास्कचा वापर व सोशल डिस्टन्सिंगचे पालन करावे. ज्येष्ठ नागरीक व लहान मुलांना जास्त जपायाला हवं*

*कोविड चा संसर्ग टाळण्यासाठी मंदिराच्या आतील बाजूस सोशल डिस्टन्सिंगचे पालन होण्याच्या दृष्टीने संबंधित विश्वस्त/कार्यकारीणी यांनी योग्य त्या उपाययोजना केलेल्या आहेत. तसेच मंदिर व्यवस्थापनाने आजूबाजूच्या परिसरात निर्जंतुकीकरणाची व्यवस्था, सोशल डिस्टन्सिंग व स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीटायझर, इ.) चे पालन होईल याकडे विशेष लक्ष दिले जाईल*

*महाशिवरात्री उत्सव कालावधीत येणाऱ्या भक्तांच्या निवासाची सोय आपल्या आसूद येथील "शिवालय" ( यात फक्त ७० वर्षांवरील जेष्ठ महिला व पुरुष भक्त तसेच शिवालय उभारणीसाठी गुंतवणूक करणारे ह्यांनी स्वत: उपस्थिती लावली असल्यास शेअर पद्धतीने), मूळ निवासस्थान व खास उभारण्यात येणाऱ्या मंडपात केली जाते. भक्तांनी महाशिवरात्री दरम्यान रात्री पडणारी थंडी लक्षात घेउन स्वत:बरोबर पुरेसे अंथरुण व पांघरुण येताना आणावे. प्रत्येकाने आपली औषधे बॅटरी इ. बरोबर आणावी....*

*जय व्याघ्रेश्वर!!*

*यंदाही नेहमी प्रमाणे श्री व्याघ्रेश्वर मंदिरात “लघुरुद्रासह सहस्त्रधारा” अभिषेकास सुरुवात झाली की,  "नवसाला" हमखास पावणारा "श्रीं" चा जयघोषातला पालखी सोहोळा संपन्न होईल*

*"श्रीं" च्या चांदीच्या मुखवट्याची विश्वस्त मंडळ व भक्त मंडळी पुजा झाल्यावर परिवाराचे अध्यक्ष, कार्यकर्ते आणि भक्तांच्या मदतीने, “श्रीं”ची पालखी नामघोषात भक्तनिवासातून मंदिरात मिरवत आणतील मंदिर परिसरातील तीन प्रदक्षिणा झाल्यावर कमानी जवळ आपल्या परिवारातील पाच सुवासिनी पालखीला ओवाळतील त्या नंतर लघुरुद्राचे आणि पालखीचे यजमान कमान ते गर्भगृहापर्यंत पालखी सन्मानाने आणतील....*

*जय व्याघ्रेश्वर !!!*

*श्री व्याघेश्वर कुलस्वामी परिवार भक्तनिवास प्रांगणात आसूद येथे मागच्या दोन चार वर्षे खंडित झालेले सभासदांचे चर्चासत्र  दरवर्षी प्रमाणे हर्ष उल्हासात आयोजित करणार आहोत. न्यासाशी संबंधित विविध विषयांवर वैचारिक देवाण घेवाण होईल हे चर्चासत्र मंगळवार दि. १ मार्च २०२२ (महाशिवरात्र) रोजी सायं ४.३० वा घेण्यात येणार आहे. सर्व उपस्थित मान्यवरांनी सभेस उपस्थित राहून वैचारिक देवाण घेवाण करावी, मौलिक सूचनांची देवाण घेवाण करावी व परिवारात आणि न्यासाच्या चर्चेत सहभागी व्हावे ही विनंती जय व्याघ्रेश्वर !!!*

*महाशिवरात्र उत्सव कार्यक्रम*
मंगळवार ०१ मार्च २०२२
*लघुरुद्रासह सहस्त्रधाराभिषेक व पालखी सोहळा*
सकाळी ९.३० ते १२.३०

*सकाळचा फराळ आस्वाद*
सकाळी ८:३० ते १०:३०

*दुपारचा फराळाचा आस्वाद*
१२:४५ ते ३:३०

*परिवाराचे वैचारिक देवाणघेवाण करणारे चर्चासत्र*
दुपारी ४.३० ते ६.००

*किर्तन, महाशिवरात्र पूजा व आरती*
रात्री ९.३० ते १२
बुधवार ०२ मार्च २०२२

*श्री सत्यनारायणाची महापूजा व आरती.*
सकाळी ८.३०  ते ९:३०

*श्रीं चा महाप्रसाद*
सकाळी ११.०० नंतर

*विविध शहरातुन प्रवासाच्या व्यवस्थेसाठी संबंधित प्रतिनिर्धीशी संपर्क साधावा*
पुणे श्री. जितेंद्र रानडे: -९०११० ३२१५२

मुंबई- श्री.नचिकेत रानडे : -९७६९३ ७४३४७
नाशिक- श्री. श्रीनिवास रानडे :-९८२२९ ६२४५४ / ९४०४२ १३१३१
गोवा - श्री. अनिल जोशी:- (०८३२) २३७४६३५ / ९४२३३०८६२६
नागपूर - - श्री देवेंद्र रानडे:- ९४२२१ ०५७३२
कर्नाटक - श्री. प्रदिप रानडे: -९४४८१ ३३७५७

*उत्सवकार्यात आपण या प्रकारे देखील मदत करू शकता*

#अ) पुढे दिलेल्या अंदाज पत्रकातील एखाद्या गोष्टीचा संपूर्ण / अंशत: खर्च स्वीकारून.

#ब) वस्तुरूप देणगी देउन. ( द्यायच्या वस्तु संदर्भात आगाऊ कळवावे ही विनंती )

#क) उत्सवकालात ज्या कामात मदत करण्याची इच्छा असेल; अशा कुठल्याही कामात व्यक्तीश: मदत करून.

#ड) मौजे आसुद येथे आपल्या परिवाराचे साधी व अद्ययावत अश्या दोनही प्रकारची सुविधा असणारे भक्तनिवास व 'शिवालय' या वास्तू आहेत, तेथे माफक दरात भोजन, चहा-नाष्टा व निवासाची वर्षभर उत्तम सोय केली आहे. तरी सर्व भक्तांना विनंती की त्यांनी व त्यांचे परिचितांनी फक्त आपल्या वास्तुतच उतरावे.

#इ) आपल्या ओळखीतील अशा व्यक्ती, की ज्यांचा कुलस्वामी श्री. व्याघ्रेश्वर आहे, अशा मंडळींना (माहेरवाशिणींसह) आपल्या परिवाराचे सभासद होण्यास प्रोत्साहित करावे. तसेच सभासद असलेल्या वडिलांनी आपल्या मुलांनाही (विशेषत: कमवत्या मुलांना / मुलींना) सभासद करून घ्यावे अशी आमची नम्र विनंती आहे.

*कार्यक्रमाचे अंदाजपत्रक :*
#१) मांडव खर्च (मुख्यतः) प्रायोजक कै. गो. का. रानडे यांचे कुटुंबिय

#२) वाडीच्या चक्क्याचे श्रीखंड: श्री. चं. ना. रानडे यांचे देणगीचे व्याजातून

#३) साजुक तुप कै. गजाननराव जोशी बेळगाव; यांचे कुटुंब

#४) नारळ, फणस इ. गोवेकर जोशी बांधव.

#५) राजगिरा वडी श्री. आनंद (नंदू) रानडे, पुणे

#६) महाप्रसादातील गोड पदार्थ श्री. सत्चिदानंद (सचिन) रानडे, पुणे

#७) महाप्रसादानंतर आईसक्रीम: श्री.धनंजय रानडे, पुणे

*आवाहन मदतीचे :-श्री महाशिवरात्र उत्सवाशिवाय इतर बाबतीतही आम्हाला या प्रकारे आपण मदत करू शकता*

#८) महाशिवरात्रीसाठी लागणारी फुले इ... रु.१०००/-

#९) चहा, कॉफी, नाष्टा इ.--५०००/-

#१०) फराळ, महाप्रसाद सामान, आचारी इ.रु.४०,०००/

#११) जमिनी करणे, मजुरी, लाईट, पाणी इ.रु.३०,०००/

#१२) महाशिवरात्र सायंकाळ कार्यक्रम इ. रु.१०,०००/

#१३) दुध इ. रु.१०,०००/

#१४) वाहतूक इ.रु.१०,०००/

#१५) इतर खर्च रु.१५,०००/
एकुण अंदाजे खर्च
रु.,२००,००० / ते रु.,२२५,०००/

*देणगी थेट जमा करण्यासाठी न्यासाचे बँक खात्यांची माहिती*

1. *SHRI VYAGHRESHVAR KULASWAMI PARIVAR*
(स्पेलिंग मध्ये किंवा मराठीत लिहिताना कुलस्वामी ऐवजी कुलस्वामिनी लिहले गेले नाही ह्याची खात्री करूनच व्यवहार करावा ही सूचना)
SB/Ac No. 1014330094, Central Bank of India, Deccan Gymkhana Branch, Pune. IFSC CODE: CBIN0280655

2. *SHRI VYAGHRESHVAR KULASWAMI PARIVAR*
(स्पेलिंग मध्ये किंवा मराठीत लिहिताना कुलस्वामी ऐवजी कुलस्वामिनी लिहले गेले नाही ह्याची खात्री करूनच व्यवहार करावा ही सुचना)
SB / Ac No. 2002605104, State Bank of India, Dapoli Branch, Ratnagiri. IFSC CODE: SBIN0001047

श्रींचे आशिर्वाद व भक्तजनांच्या सढळ व सहृदय दानीवृत्तीने हे कार्य यशस्वीरित्या संपन्न होत असते. आपल्या प्रतिसादाची दारवर्षी प्रमाणे यंदाही मिळेल तसेच आपला स्वतः हुन सहभाग घ्याल असा खात्रीशीर प्रयत्न करू.

आणखी काय लिहायचे, कळावे लोभ आहेच; आता प्रत्यक्ष भेटच व्हावी ही श्री व्याघ्रेश्वराचे चरणी प्रार्थना !!
*जय व्याघ्रेश्वर !!!*

*गर्दी होणार नाही तसेच सोशल डिस्टन्सिंगच्या नियमांचे तंतोतंत पालन होईल याकडे मंदिराचे व्यवस्थापक व स्थानिक प्रशासन यांनी विशेष लक्ष देऊन, त्याचप्रमाणे महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने संबंधित स्थानिक प्रशासनाचे सहाय्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना व जनजागृती करू अशी हमी दिली आहे जय व्याघ्रेश्वर !!!*
*उत्सव कुपन जपून ठेवणे गरजेचे आहे तसेच ते हस्तांतरणीय नाही हे लक्षात घ्यावे. कुपन असल्याशिवाय भोजन कक्षात प्रवेश दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.*

*अध्यक्ष*
*श्री शिरीष जोशी*
*श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार*